# 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०': ओळख

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' हे पदवी पातळीवरील तीन/चार वर्षीय बहुविद्याशाखीयअभ्यासक्रम, श्रेयांक व्यवस्था, तत्संबंधी विविध नियम विकसित करते. या धोरणांतर्गत एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम, तीन वर्षांची बॅचलर्सपदवी, चार वर्षांची बॅचलर्सपदवी (संशोधन/ऑनर्स) आणि बहु आगमन-निर्गमनपर्याय देणारी पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोयदिलेली आहे.

हे धोरण उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्येरूपांतरणकरण्याचा प्रयत्न करते. विद्यार्थ्यांनाया चार वर्षीय बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात लवचिकता असेल आणि त्यांना आवश्यक श्रेयांक संरचनेसह किती काळाचा अभ्यासक्रम निवडायचायाचे स्वातंत्र्य असेल. त्यांना, त्यांच्या अभ्यासाच्या कालावधीनुसार प्रमाणपत्र, पदविका, पदवी प्रदान करण्यात येईल. त्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरच्या गरजेनुसार शिक्षणनिवडकरण्याचेस्वातंत्र्यअसेल. बहु आगमन-निर्गमन हे विद्यार्थ्यांसाठी मोठे वरदान असेल. त्यांना,मध्येच शिक्षण सोडून दिल्यामुळे, पूर्वी होणारा कोणताही तोटा आता होणार नाही.

चारवर्षांचा बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनात्यांनी निवडलेल्या मुख्य व उपविषयांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याची मुभा देते. या अभ्यासक्रमांतर्गत असणारे विविध अभ्यासक्रम हे कौशल्याधारित, निवड आधारित, बहुविद्याशाखीय,आंतरविद्याशाखीय,बाह्यविद्याशाखीय आहेत. ही लवचिकता विद्यार्थ्यांना विविध अभ्यासशिस्तींचा परिचय करून देते. 'राष्ट्रीयशैक्षणिक धोरण २०२०' विद्यार्थ्यांसाठी प्रस्तावित केलेली प्रशिक्षुता

(Internship), शिक्षुता (Apprenticeship) ही विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता विकसित करेल आणि उद्योग-शैक्षणिक संबंध वृद्धिंगत करेल. जगभरामध्ये शिक्षुता (Apprenticeship) हे प्रत्यक्षकामकाजाच्या वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी सर्वात कार्यक्षमआणि आश्वासक असे नियोजनबद्ध प्रशिक्षण मानले जाते. यामध्ये संबंधित विषयाच्या सैद्धांतिक ज्ञानासह कार्याधारित शिक्षण देण्याची प्रचंड क्षमता आहे. एखाद्या विशिष्ट विषयात विद्यार्थी त्यांचा तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर चौथ्या वर्षात ऑनर्स पदवी किंवा संशोधन पदवी मिळवू शकतात. याप्रकारची लवचिकता विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरचे नियोजन करण्यात उपयुक्त ठरू शकेल व हे त्यांच्यासाठी मोठे वरदान असू शकेल. आता यानंतर कला आणि विज्ञान, अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर कार्यक्रम (extracurricular activities), व्यावसायिक आणि पारंपरिक शैक्षणिक प्रवाह यामध्ये फारसे अंतर उरणार नाही. ही परिस्थिती विद्यार्थ्यांना त्यांचे आयुष्य यशस्वीतेने जगण्यासाठी उपकारक ठरेल. एकविसाव्या शतकाची आव्हाने स्वतंत्रपणे पेलण्यासाठी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'ही गुरुकिल्ली ठरू शकेल.

# मुख्य आणि उपविषय

एन.इ.पी.-२०२० मध्ये विद्यार्थ्यांना बहुविद्याशाखीय आणि विज्ञान, कला आणि मानव्यविद्या, क्रीडा आणि  समाजशास्त्र अशा विविध शाखांमधील विषय एकाच वेळी निवडायची लवचिकता आणि स्वातंत्र्य मिळू शकते. त्यांना, त्यांच्या आयुष्यात त्यांच्यातील आवडीनुसार, कलागुणांनुसार त्यांच्या भविष्यातील शिक्षणाचा मार्ग आणि करिअरच्या पर्यायांची निवड करणे सोपे झाले आहे. उच्च शिक्षण घेता घेता जर आपली एखाद्या विषयाची निवड चुकली असे वाटले, तर निवडलेल्या पर्यायांमध्ये सुधारणा किंवा बदल करण्याची संधी या धोरणामध्ये आहे. चार वर्षांचा बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी जी लवचिकता आणि विद्यार्थ्यांसमोर विविध शाखांमधील बहुविध पर्याय देणारे क्रेडिट्स म्हणजेच श्रेयांक उपलब्ध करून देणे गरजेचे होते, ते येथे दिले आहेत. आता समजा तुम्हाला जर मुख्य(Major/ Core) आणि उपविषयांची (Minor) निवड करायची असेल आणि त्यांचे आपल्या सोयीनुसार ‘अद्वितीय मिश्रण’ करायचे असेल तर त्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि कला,व इतर आंतर-विद्याशाखीय अभ्यासक्रमांचा व्यवस्थित अभ्यास केला पाहिजे. मुख्य किंवा कोअर विषय म्हणजे विद्यार्थ्याला मुख्यतः ज्या विषयामध्ये पदवी मिळवायची आहे असा विषय. याबरोबरच विद्यार्थ्याला बहु किंवा आंतर-विद्याशाखीय विषयांतील सखोल ज्ञान, हे सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष अनुभवावर मिळवणे आवश्यक असते. हे ज्ञान उपविषयांची निवड केल्यावर मिळते. त्यानंतर विद्यार्थ्याला सर्व सामान्य किंवा खुल्या पर्यायी विषयांची निवड करायची आहे. यात व्यावसायिक शिक्षण

आणि प्रशिक्षण, कौशल्य विकास घडवणारे अभ्यासक्रम, क्षमता विकास करू शकणारे अभ्यासक्रम, मूल्याधिष्ठित शिक्षण, क्रीडा, कला, सांस्कृतिक कार्यक्रम यांसारखे सह-अभ्यासेतर अभ्यासक्रम यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, आता एखाद्या विद्यार्थ्याला चार वर्षाच्या कॉम्प्युटर इंजीनियरिंग पदवीसाठी एकूण १६० श्रेयांक (credits) चार वर्षात मिळवायचे आहेत. त्यातील कॉम्प्युटर इंजीनियरिंग चे किमान ८० श्रेयांक त्याला निवडावे लागतील त्यानंतर तो उपविषय म्हणून शास्त्रीय संगीत निवडून त्यात १८ ते २२ श्रेयांक त्याला निवडावे लागतील. असे केल्यानंतर त्याला भविष्यात शास्त्रीय गायक म्हणून समांतर करिअर करण्यासाठी मायनर किंवा उपपदवी मिळू शकेल.”

दुसऱ्याविद्यार्थ्यालाअर्थमिती (Econometrics) या विषयात पदवी हवी आहे. हा विषय आंतरविद्याशाखीय आहे. अर्थमितीतील पदवीसाठी, मुख्य विषयाचे श्रेयांक हे त्या विषयाच्या कक्षेतील विविध घटक विषयांमध्ये वितरित केले जातील. याप्रमाणे या विषयातील तीन वर्षांच्या पदवीसाठी अर्थशास्त्र, संख्याशास्त्र आणि गणिताचे एकूण १२० पैकी किमान ६० श्रेयांक मिळवणे आवश्यक आहे आणि अमरला चार वर्षांची संशोधन पदवी मिळवायची असेल तर त्यासाठी १८० पैकी किमान ८० श्रेयांक मिळवणे आवश्यक आहे. अमरला जर त्याने तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला तर त्याला अर्थमीतीमधील बीएससी पदवी मिळेल आणि त्याने जर चार वर्षांचा अर्थमीतीतील अभ्यासक्रम पूर्ण केला तर त्याला अर्थमीतीतील बीएससी (संशोधनासह ऑनर्स) ही पदवी मिळेल.जर पदवीच्या काळातील पहिल्या सहा सत्रांमध्ये ७५ टक्के गुण मिळाले किंवा CGPA ७.५ असेल आणि याच विषयात पदवी पातळीवर संशोधन करायची इच्छा असेल, तर विदयार्थी

चौथ्या वर्षासाठी संशोधन करणे स्वीकारू शकतो. म्हणजे, चौथ्या वर्षात अर्थमिती या विषयाच्या अंतर्गत बारा श्रेयाकांचा एक संशोधन प्रकल्प निवडता येईल. जर सातत्याने ७५ टक्के गुण किंवा ७.५ CGPA मिळाले, तर या चार वर्षांच्या अर्थमीती विषयातील बीएससी (संशोधनासह ऑनर्स) या पदवीनंतर परिमाणात्मक अर्थशास्त्र (Quantitative Economics) या विषयातविदयार्थी पीएचडी साठी संशोधन करायला पात्र ठरू शकतोस.”

# ABC आणि क्रेडिटहस्तांतरण

क्रेडिट ट्रान्स्फरमुळे आंतरविद्याशाखीय किंवा बहुविद्याशाखीय शिक्षणाला गतिमानता अणि लवचिकता मिळते. एकतर पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांला आगमन-निर्गमनाची सवलत मिळते आणि श्रेयांक हस्तांतरणामुळे त्यात प्रवाहीपणा येतो. याकरिता श्रेयांकांची शैक्षणिक बँक (Academic bank of credits -ABC ) तयार केली जाणार आहे.नॅशनल ॲकडमिक डिपॉझिटरीच्या (NAD) धर्तीवर एक आभासी गोदाम (virtual storage) तयार केले जाणार आहेत. यात श्रेयांकांचे मान्यता, श्रेयांक संचय, श्रेयांक हस्तांतरण आणि श्रेयांक विमोचन यांची सुविधा उपलब्ध असेल. यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात सोय होईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुसार शिक्षण देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना ABC मध्ये NAD द्वारे नोंदणी करणे आवश्यक असेल. अशा नोंदणीकृत उच्च शिक्षण संस्थाच विद्यार्थ्यांनी मिळवलेले श्रेयांकन (क्रेडिट) अपलोड करू शकतात. याकरिता विद्यार्थ्यांनीसुद्धा स्वतःचे डिजिलॉकर तयार करणे बंधनकारक आहे. (लिंक - https://wwwdigilocker.gov.in) विद्यार्थ्यांनी त्यासाठी त्यांचा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक किंवा आधार क्रमांक वापरायचा आहे आणि ही सर्व माहिती ABC Id विजेटचा वापर करून तयार झालेले ABC Id म्हणजे ओळखपत्र डाऊनलोड करून ठेवायचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला हा केवळ त्याचाच असणारा युनिक ABC Id हा नंतर कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश करण्यासाठी वापरायचा आहे. त्याखेरीज त्यांना प्रवेश मिळू शकणार नाही. याबरोबरच विद्यार्थी www.abc.gov.in या वेबसाईटवर

जाऊन Meri Pehchanवर स्वतःच्या नोंदणीकृत मोबाईल किंवा आधार क्रमांकाने आपले ABC Id तयार करू शकतात.”

एकदाका विद्यार्थ्यांने नोंदणीकृत शिक्षण संस्थेना ABC Id कळवला की ती शिक्षण संस्था त्या विद्यार्थ्याची सर्व माहिती गोळा करेल आणि NAD फॉर्मेटमध्ये त्याची स्वतंत्र फाईल बनवेल. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांने मिळवलेले श्रेयांक( क्रेडिट्स) त्याच्या ABC खात्यात दिसतील आणि मग हे श्रेयांक एका नोंदणीकृत शिक्षण संस्थेकडून दुसऱ्या नोंदणीकृत संस्थेकडे विद्यार्थ्यांनी विनंती केल्यावर, हस्तांतरित केले जाते. विद्यार्थ्यांने ABC कडे श्रेयांक हस्तांतरणाची विनंती केल्यानंतर ज्या शिक्षण संस्थेकडे श्रेयांक हस्तांतरण करण्याची विनंती केली आहे तिने मंजुरी दिल्यानंतर ही हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईल.

ABC नोंदणीकृत उच्च शिक्षण संस्था (RHEIs) ची डायनॅमिक ऑनलाइन निर्देशिका ठेवेल जी ABC नियमन-2021 अंतर्गत निर्धारित केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करेल. RHEI विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या डिग्री सानुकूलित करण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यासक्रमांचा वापर करून डिझाइन करण्यास प्रोत्साहित करेल आणि सक्षम करेल. एक किंवा अधिक नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांद्वारे ऑफर केलेल्या अभ्यासक्रमांमधून, विद्यार्थ्याने पदवी किंवा डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र प्रदान करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थेकडून किमान पन्नास टक्के क्रेडिट मिळवणे आवश्यक आहे आणि पुढे प्रदान केले आहे की, विद्यार्थ्याने मुख्य किंवा मुख्य विषयातील पदवी किंवा डिप्लोमा किंवा प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या मूळ/मुख्य विषय क्षेत्रात एकूण क्रेडिट्सच्या 50% मिळवणे आवश्यक आहे.

प्रमाणपत्र, डिप्लोमा किंवा पदवी गोळा केल्यावर, त्या प्रमाणपत्र, डिप्लोमा किंवा पदवीच्या संदर्भात, तोपर्यंत मिळवलेली सर्व क्रेडिट्स संबंधित खात्यातून डेबिट केली जातील आणि हटविली जातील आणि त्यानंतर इतर कोणत्याही औपचारिक शैक्षणिक पुरस्कारासाठी पुन्हा वापरता येणार नाहीत. पात्रता. ABC कडे कमावलेली आणि जमा केलेली क्रेडिट्स जास्तीत जास्त सात वर्षांच्या कालावधीसाठी पदवी किंवा डिप्लोमा किंवा प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी वैध असतील. जेथे विद्यार्थ्याने विशिष्ट पदवी किंवा डिप्लोमा किंवा प्रमाणपत्रासाठी RHEI द्वारे मंजूर केलेल्या क्रेडिट्सच्या एकूण संख्येच्या आणि क्रेडिटच्या स्वरूपाचे प्रमाण पूर्ण केले असेल, तेव्हा विद्यार्थी त्या HEI द्वारे अशा पुरस्कारासाठी पात्र असेल.

शैक्षणिक परिषद सारख्या वैधानिक प्राधिकरणाच्या मान्यतेने, RHEI ला ABC द्वारे ऑफर केलेल्या अभ्यासक्रमांची रचना कोर कोर्सेस किंवा कोअर इलेक्टिव्हज किंवा ओपन इलेक्टिव्ह किंवा स्किल एन्हांसमेंट इलेक्टिव्हज किंवा क्षमता वर्धित इलेक्टिव्ह इत्यादी म्हणून योग्य क्रेडिटसह वाटप करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. बहु-विषय किंवा आंतरविद्याशाखीय उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यकता. विद्यार्थ्यांना, कोणत्याही स्तरावर बाहेर पडण्याची निवड करून, तीन वर्षांच्या आत पदवी कार्यक्रमात पुन्हा प्रवेश करण्याची आणि निर्धारित कमाल सात वर्षांच्या कालावधीत बहु-विद्याशाखीय चार वर्षांचा पदवी कार्यक्रम पूर्ण करण्याची परवानगी आहे.

# आगमन-निर्गमन पर्याय

शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये एकाधिक प्रवेश आणि निर्गमन बिंदू सक्षम करण्यासाठी, प्रमाणपत्र, डिप्लोमा, पदवी यांसारखी पात्रता पातळी 4.5 ते स्तर 8 पर्यंत चढत्या क्रमाने स्तरांच्या मालिकेत आयोजित केली जाते. स्तर 4.5 प्रमाणपत्राचे प्रतिनिधित्व करते आणि स्तर 8 चे प्रतिनिधित्व करते पीएच.डी. संशोधन पदवी.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये येऊ घातलेल्या तीन/चार वर्षांच्या बहुविद्याशाखीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रचना त्यासाठीची पात्रता, त्याचे प्रकार, आवश्यक श्रेयांक, अभ्यासक्रमातील आगमन-निर्गमानाचे वेगवेगळे नियम आणि कालावधी याबद्दल माहिती देण्यास प्रारंभ केला. शालेय शिक्षणासाठी NCRF श्रेयांक स्तर चार आहे. (शालेय शिक्षण संपेपर्यंत विद्यार्थ्याला मिळणाऱ्या श्रेयांकाचा स्तर ४  असेल.) तर उच्च शिक्षणासाठी हा स्तर ४.५ ते ८ असा असेल. पदवी पातळीवर हा स्तर  ४.५, ५.०,५.५, ६.० आणि पदव्युत्तर पातळीवर हा स्तर ६.०,६.५, ७.० आणि पीएच.डी स्तरावर  ८.० असेल. व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी व्यावसायिक शिक्षण आणि तंत्रज्ञान याचा स्तर १ ते ८ असा आहे. (स्तर १ ही यास्वरूपाच्या शिक्षणाची क्षमता आणि जटीलतेच्या दृष्टिकोनातून सर्वात खालची पातळी आहे तर ८ ही पातळी अभ्यासक्रमाची क्षमता आणि जटीलतेच्या दृष्टिकोनातून सर्वोच्च पातळी आहे. खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे उच्च आणि व्यावसायिक शिक्षण/ कौशल्य यासाठी दिले जाणारे श्रेयांक, त्याचे विविध स्तर आणि शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक सत्रांची संख्या आहे.

आगमन-निर्गमन पर्यायांसह चार वर्षीय बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमांसाठी पात्रता प्रकार आणि श्रेयांकांची आवश्यकता दाखवणारा तक्ता -

| स्तर | पात्रता | किमान आवश्यक श्रेयांक | वर्ष आणि सत्र |
|---|---|---|---|
| ४.५ | पदवीपूर्व प्रमाणपत्र | ४० | १ वर्ष,२ सत्रे |
| ५ | पदवीपूर्व पदविका | ८० | २ वर्षे,४ सत्रे |
| ५.५ | बॅचलर पदवी | १२० | ३ वर्षे,६ सत्रे |
| ६.० | बॅचलर पदवी ऑनर्स | १६० | ४ वर्षे,८ सत्रे |
| ६.० | बॅचलर पदवी संशोधनासह ऑनर्स | १६० | ४ वर्षे,८ सत्रे |

४० श्रेयांक मिळवल्यानंतर पहिल्या वर्षाच्या ४.५ शैक्षणिक अभ्यासक्रमातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयातील पदवीपूर्व प्रमाणपत्र दिले जाईल; पण त्यासाठी त्याला कामावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये किंवा उन्हाळ्याच्या कालावधीत पूर्ण केलेल्या शिक्षुता (Internship)मध्ये, त्याने निवडलेल्या कौशल्याधारित अभ्यासक्रमातील ६ श्रेयांकांबरोबर ४

श्रेयांक मिळवावे लागतील. निर्गमन करणाऱ्या विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता व कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी या अटी घातल्या आहेत. पदवी देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना या ४ श्रेयांकांसाठी कार्याधारित व्यावसायिक अभ्यासक्रम किंवा शिक्षुता याची यंत्रणा व त्याद्वारे रोजगार नियुक्तीचीही यंत्रणा निर्माण करावी लागेल. याचप्रकारे शैक्षणिक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्ष स्तर ५.० मधून निर्गमन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयामध्ये पदवीपूर्व पदविका प्रदान केली जाईल. परंतु त्यासाठी त्यांना प्रथम किंवा दुसऱ्या वर्षाच्या उन्हाळी सुट्टीत त्याने निवडलेल्या कौशल्याधारित अभ्यासक्रमामध्ये अतिरिक्त ४ श्रेयांकांची जोड द्यावी लागेल.